महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ११ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज ठाणे कोर्टात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** मनसे अध्यक्ष राज ठाकरे ११ डिसेंबर रोजी ठाणे कोर्टात एका गुन्ह्यातील सुनावणीसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासोबत मनसे नेते अविनाश जाधव, शहर अध्यक्ष रवींद्र मोरे हे देखील आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहणार आहेत. ठाण्याच्या गडकरी नाट्यगृहाच्या समोरील रोडवर १२ एप्रिल २०२२ मध्ये मनसेची उत्तर सभा झाली होती. या उत्तर सभेमध्ये स्वागत करताना शहराध्यक्ष रविंद्र मोरे यांनी राज ठाकरे यांना तलवार भेट दिली होती. खुलेआमपणे व्यासपीठावर तलवार दिली म्हणून रवींद्र मोरे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांच्यासह राज ठाकरे यांच्यावरही नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा आर्म ॲक्ट नुसार दाखल झाला होता.

## मतदार याद्यांतील गोंधळ

### शेकडो मतदारांचा पत्ता जंगलात ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेच्या क्रमांक १ च्या प्रारुप मतदार याद्यांमध्ये शेकडो मतदारांची नावे जंगलात, ओसाड जागांमध्ये आणि अस्तित्वातच नसलेल्या घरांमध्ये दाखविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

दुबार-तिबार नावे, स्थलांतरित व मृत व्यक्तींच्या नोंदी आणि मूळ रहिवाशांना इतर प्रभागात पाठवल्याने मतदार यादीबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित राहिले आहे. यामुळे या मतदार यादीत सुधारणा करण्याचा इशारा मनसेने निवडणूक विभागाला दिला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी जारी केलेल्या प्रारुप मतदार याद्यांतील प्रभाग क्रमांक १ मध्ये मोठा घोळ उघडकीस आला आहे. झाडे असलेल्या निर्जन जागांमध्ये, आयडीआय व अमरडाय कंपनीच्या कॉलनी परिसरात शेकडो मतदारांच्या नोंदी असल्याचे आढळले. त्यामुळे मतदार यादीची विश्वासार्हता आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# राज्यात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफ

## येत्या आठ दिवसात अंमलबजावणी करा - राहुल नार्वेकर यांचे निर्देश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर :** पर्यावरणपूरक वाहतूक प्रोत्साहनासाठी राज्य सरकारने इलेक्ट्रिक वाहनांसाठी विशेष धोरण लागू केले असून त्यानुसार ई-वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. मात्र, धोरण लागू झाल्यानंतरही समृद्धी महामार्ग आणि मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर इलेक्ट्रिक वाहनांकडून टोल आकारला जात असल्याचे उघड झाले आहे. या गैरप्रकाराची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी परिवहन विभागाला आठ दिवसांच्या आत ई-वाहनांकडून होणारी टोलवसुली त्वरित थांबवण्याचे आदेश दिले.

प्रश्नोत्तर तासात चर्चा करताना आमदार अनिल पाटील यांनी गेल्या तीन महिन्यांत इलेक्ट्रिक वाहनांकडून झालेली टोलवसुली ही बेकायदेशीर असल्याचा आरोप केला. ही वसुली वाहनमालकांना परत द्यावी किंवा सरकारी खात्यात जमा करण्याचे निर्देश संबंधित विभागाला द्यावेत, तसेच टोल कंपनीची चौकशी करण्यात यावी, अशी त्यांची मागणी होती. या मुद्द्यावर पुढे बोलताना आमदार नाना पटोले यांनीही बेकायदेशीर टोलवसुली करणाऱ्या कंपनीची निविदाच रद्द करण्याची मागणी केली.

विधानसभा अध्यक्षांनीही गैरवसुलीला गंभीर समस्या म्हटले. त्यांनी सांगितले की, सरकार नागरिकांना पर्यावरणपूरक दृष्टीकोनातून इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्यास प्रोत्साहन देत आहे, परंतु त्याच वाहनांवर टोल आकारला जात असल्याने सरकारी धोरणाचेच उल्लंघन होत आहे. त्यामुळे टोलमाफी धोरणाची अंमलबजावणी तातडीने व काटेकोरपणे करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धोरणाच्या अंमलबजावणीत इतर अडचणींचा उल्लेख करताना नार्वेकर यांनी राज्यातील ई-वाहन चार्जिंग स्टेशन्सची कमतरताही अधोरेखित केली. सध्या उपलब्ध असलेली ३० वॅट क्षमतेची चार्जिंग स्टेशन्स वाहन पूर्ण चार्ज करण्यास तब्बल ८ तास घेतात. जलद चार्जिंगसाठी १२० वॅट क्षमतेच्या स्टेशनची गरज आहे, परंतु त्यांची उभारणी पुरेशा प्रमाणात झालेली नाही.

या सर्व प्रश्नांना उत्तर देताना नगरविकासमंत्री दादा भुसे यांनी माहिती दिली की, राज्य सरकारने २३ मे २०२५ रोजी इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी देणारे धोरण जाहीर केले होते आणि ते २२ ऑगस्टपासून लागू करण्यात आले. परंतु परिवहन विभागाने टोल प्लाझांवर हे धोरण अंमलात आणण्यास विलंब केल्याने काही मार्गांवर टोलवसुली सुरूच राहिली आहे. ई-वाहनांचा अद्ययावत डेटा टोल प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याचे काम सुरू असून अंमलबजावणीची प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल, असे भुसे यांनी स्पष्ट केले.

# रस्ता रुंदीकरणात वन विभागाच्या अडचणी दूर होणार?



दै.ठाणेजीवनदीपवार्ता

**ठाणे :** ठाणे आणि मिरा भाईंदर या दोन शहरांना जोडणाऱ्या घोडबंदर मार्गाच्या रुंदीकरणांसदर्भात वन विभागाच्या काही तांत्रिक अडचणी येत आहेत. नागपूरमध्ये एक महत्त्वाची बैठक त्यासंदर्भात पार पडली आहे. गायमुख ते फाउंटन दरम्यानचा रस्ता रुंद करण्यासाठी वनविभागाचा अडथळा लवकरात लवकर दूर करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यामुळे या अडचणी आता दूर होण्याची शक्यता आहे. घोडबंदर मार्गावरुन अवजड वाहनांची वाहतुक मोठ्याप्रमाणात होते. तसेच मिरा भाईंदर, वसई-विरार या भागाला हा मार्ग ठाणे, नवी मुंबईशी जोडतो. मार्गाच्या रुंदीकरणात वन विभागाकडून परवानग्या मिळत नसल्याने रुंदीकरणाचे काम रखडलेले आहे. बुधवारी विधिमंडळात झालेल्या उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, संबंधित विभागांचे सचिव तसेच ठाणे व मिरा-भाईंदर महापालिकांचे आयुक्त उपस्थित होते. मिरा-भाईंदर आणि ठाणेकरांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या घोडबंदर ते फाउंटन हॉटेल आणि फाउंटन हॉटेल ते गायमुख या दोन्ही टप्प्यांवरील रस्ता रुंदीकरण व विकासकामांना गती देण्यासाठी वनविभागाचा ना-हरकत दाखला अत्यंत महत्त्वाचा आहे. दोन्ही महापालिकांनी आपले प्रस्ताव वनविभागाकडे सादर केले असले, तरी विभागाने सुचविलेल्या त्रुटी तातडीने दूर करण्यासाठी दोन्ही महापालिकांनी एक समन्वय अधिकारी नियुक्त करावा, असेही निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

## अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीतून एकाची माघार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगर परिषदेच्या पुढे ढकलण्यात आलेल्या निवडणुकीच्या सुधारित वेळापत्रकानुसार बुधवारी अवघ्या एका उमेदवाराने उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. तर कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या पाच प्रभागातील रखडलेल्या निवडणुकीतही एका भाजप बंडखोर अपक्षाने अर्ज मागे घेतला आहे. अंबरनाथ शहराच्या संपूर्ण तर बदलापुरातील पाच प्रभागांसाठी येत्या २० डिसेंबर रोजी मतदान संपन्न होईल. तर दुसऱ्या दिवशी २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. अंबरनाथमध्ये नगराध्यक्ष पदाच्या निडणुकीसाठी उमेदवारांची संख्या ८ असणार आहे.

## टिटवाळ्यातील आदिवासी कातकरी शेतकऱ्याला शासकीय योजनेचा लाभ मिळण्यास वनविभागाचा अडथळा?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** विविध शासकीय योजनांचा लाभ गोरगरीब, आदिवासी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांना मिळावा म्हणून शासन अनेक उपाययोजना, उपक्रम, अभियान राबवित असताना दुसरीकडे याच शासनाचा एक भाग असलेला वनविभाग मात्र यावर पाणी फिरवत आहे, नेमका असाच प्रकार टिटवाळयातील आदिवासी शेतकऱ्यांच्या बाबतीत घडला असून त्याला वरील योजनेतून विहिरी मंजूर झाली असताना केवळ कल्याण वनविभागाच्या आडमुठ्या धोरणामुळे या शेतकऱ्यांची भाजीपाला पिके, फळबाग, विविध झाडे, रोपे, पाण्याविना करपू लागली आहेत. टिटवाळयातील शिवाजी लहाण्या मुकणे याला वडिलोपार्जित म्हसकळ फाट्याजवळ सुमारे२एकरच्या वर जमीन आहे, सक्र३५/१ब क्षेत्र००८१:००हेक्टर आर इतके आहे, यामध्ये ते स्वतः पत्नी व ३सुना२मुले व नातवंडे असा८/१०लोक या जमिनीत भाजीपाला, भात लागवड, करून कुंटूबांचा उदरनिर्वाह करत आहेत, त्यांच्या कडे या जमीनीचा७/१२देखील आहे, कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाच्या पुढाकाराने त्यांना बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत सन२०२५-२६या वर्षासाठी विहीर मंजूर झाली आहे, या विभागाकडून या रेखांकन देखील झाले आहे, येथे विहीर झाली तर हे संपूर्ण क्षेत्र सिंचनाखाली येवून या आदिवासी कुंटूबियांना मोठा आधार मिळणार आहे, सध्या पाण्यात अभावी येथील वांग्याची रोपे, कारली, गोसाळी, तूर, तसेच आंबा, चिकू, पेरू, शिताफळ, चिंच, काजू, जांभूळ, फणस आदी फळझाडे सुकू लागली आहेत, असे असताना 'हे क्षेत्र संरक्षित वनक्षेत्रात मोडत असल्याने वन संरक्षण कायदा१९८०अंतर्गत परवानगी देणे शक्य नाही,असे पत्रच शेतकरी शिवाजी मुकणे यांना कल्याण वनविभागाने पाठवले आहे. विशेष म्हणजे , कल्याण तालुक्यात वनजमिनीवर अतिक्रमण होत नाही का?वनजमिनीरील लालमाती, वाळू, याची चोरी होत नाही का?झांडाची बेसुमार तोड होत नाही का?विविध रस्त्यासाठी शेकडो झाडांची कत्तल ठेकेदाराने केली, त्याचे काय?कल्याण मुरबाड रस्त्याच्या बाजूला झाडे लावली का?ठेकेदार, कार्यकर्ते ,यांचे ट्रक, आयवा पकडल्यावर, पुढा-याच्या फोननंतर ते सोडले जात नाही का?याचे उत्तर प्रथम वन विभागाने द्यावे, एक आदिवासी लाभार्थी शासकीय योजनेचा लाभ घेतोय, कृषी अधिकारी प्रामाणिकपणे प्रयत्न करताहेत तर वन विभागाने थोडे सहकार्य करायला काय हरकत आहे, याचा विचार करायला हवा, याबाबत कल्याण वनाधिकारी श्री आखाडे यांना संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.




# डॉ.रमेश प्रभू यांचे नाव विलेपार्ले मेट्रो स्टेशनला देण्यासाठी निश्चित प्रयत्न करेन

## -मंत्री ॲड आशिष शेलार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** शैक्षणिक,क्रीडा, आरोग्य,राजकीय क्षेत्रात स्वतःला झोकून समरसतेची वृत्ती जोपासणारे माजी आमदार-माजी महापौर डॉ.रमेश प्रभू यांनी शिवसेनेसाठी आपले जीवन समर्पित केले आणि विलेपार्ले ला समृध्द करण्याचे मोलाचे काम त्यांनी केले.

१९८७च्या विलेपार्लेच्या पोटनिवडणुकीत शिवसेनाप्रमुखं बाळासाहेब ठाकरे यांनी खारदांड्याच्या शंकर मंदिरात झालेल्या प्रचारसभेत हिंदुत्वावर मते मागितली, त्यामुळे १९९५ साली निकाल देत या दोघांचा सहा वर्षे निवडणूक लढवण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क सर्वोच्च न्यायालयाने काढून घेतला.त्यानंतर डॉ.प्रभू यांचे नाव हिंदुत्वाशी जोडले गेले आणि देशात ही निवडणूक चर्चेत आली.मात्र नंतर त्यांची शिवसेनेने अवहेलना केली अशी खंत राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अँड.आशिष शेलार यांनी काल रात्री पार्ल्यात व्यक्त केली.तर डॉ.प्रभू यांची कन्या लीना प्रभू यांच्या सूचनेवरून आजच्या पिढीला त्यांचे कार्य समजावे म्हणून “प्रभू महिमा” हे पुस्तक राज्यातील प्रत्येक लायब्ररीत ठेवण्यासाठी आणि त्यांचे नाव विलेपार्ले येथील मेट्रो स्टेशनला देण्याचा पार्लेकरांच्या वतीने आग्रह केला.

मी निश्चित प्रयत्न करेन असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले. आपला ठसा उमटवण्या डॉ.रमेश प्रभू यांच्या जीवनाची झलक दाखविणारे नाट्यरूप सादरीकरण होणारे ते पहिलेच, माजी महापौर असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, जुहू–विलेपार्ले (मुंबई) चे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. रमेश प्रभू आणि त्यांची पत्नी, प्रख्यात वैद्यकीय चिकित्सक स्व. डॉ. पुष्पा प्रभू यांच्या जीवनप्रवासावर आधारित “प्रभू महिमा” या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा काल रात्री विलेपार्लेच्या दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित केला होता,त्यावेळी मंत्री शेलार मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.त्याआधी डॉ.रमेश प्रभू आणि डॉ.पुष्पा प्रभू यांच्या कार्याचा आणि प्रेरणादायी जीवनाची झलक दाखविणारे, लीना प्रभू संकल्पित नाट्यरूप सादरीकरण देखील यावेळी सादर केले होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून विलेपार्ल्याचे आमदार अँड.पराग अळवणी,तसेच प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार-माजी मंत्री गजानन कीर्तिकर, माजी महापौर अँड.निर्मला सामंत प्रभावळकर,प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे विश्वस्त राजू रावळ,डॉ.प्रभू यांचे पूत्र अरविंद प्रभू,कन्या लीना प्रभू आणि सुमारे साडेतीन तास मोठ्या संख्येने पार्लेकर उपस्थित होते.आमदार ॲड .पराग अळवणी म्हणाले की,डॉक्टर यांचे जीवनपट आणि कार्य म्हणजे आमच्या साठी एक सिलॅबस आहे.या पुस्तकाने त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व नवीन पिढीला समजेल. शिवसेना भाजप युतीसाठी डॉ.रमेश प्रभू यांनी शिवसेनाप्रमुख आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांची पार्ल्यात रमेश मेहता यांच्या घरी शिवसेनाप्रमुख घेवून जात त्यांची भेट घडवून आणली हा किस्सा त्यांनी सांगितला.१९८७ साली हिंदुत्वावर ते निवडणूक लढले.त्यांची निवडणूक न्यायालयाने रद्द केली,मात्र हिंदुत्व ही एक जीवनशैली असे कोर्टाने सांगितले.हिंदुत्व आज १००० वर्षाची फिलॉसॉफी झाली आहे,आणि या लढ्यात डॉ. रमेश प्रभू यशस्वी झाले असे त्यांनी ठामपणे सांगितले. याप्रसंगी, आळवणी जी हेही म्हणाले की डॉक्टर साहेबांना अपक्ष उमेदवारी दाखल करायचीच नव्हती. आणि शिवसेनेलाही ते नको होतं. बऱ्याच जणांनी त्यांच मन वळवण्याचा प्रयत्न केला, पण मला असं वाटतं की जर मातोश्री वर एक भेट झाली असती तर अपक्ष उभ राहण्याची वेळ आली नसती. जेव्हा एक कार्यकर्ता आपले सर्वस्व अर्पण करून एका पार्टीसाठी काम करतो, आणि ती पार्टी त्या कार्यकर्त्याचा मान राखत नाही,तेव्हा निश्चितच मन दुखावलं जातं. गजानन कीर्तिकर यांनी डॉ.रमेश प्रभू यांच्या अनेक आठवणी जागवल्या.त्यांच्या आठवणी पुस्तक रूपाने चिरकाल टिकल्या पाहिजेत असे आवाहन करत त्यांचा आणि पत्नीचा जीवनपट पुस्तक रूपात उलगडल्याबद्दल त्यांनी प्रभू कुटुंबाचे कौतुक केले.अँड.निर्मला सामंत - प्रभावळकर म्हणाल्या की,डॉक्टर हे राजकारणातील वेगळे राजकारणी होते.त्यांचा क्रीडा,पर्यावरण,सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि त्यांचा न्यायालयीन खटला वकील म्हणून जवळून बघितला.त्यांच्या जीवनप्रवासात अनेक अडचणी आल्या,त्यावर मात करून त्यांनी आपला ठसा उमटवला असे गौरवोद्गार आपण काढले.राजू रावळ यांनी बाळासाहेब ठाकरे आणि बाळासाहेब देवरस यांची डॉ.प्रभू यांनी घडवलेल्या भेटीचा आपण साक्षीदार होतो.१९८७ च्या पोटनिवडणुकीत प्रचाराला आपण अहमदाबाद वरून शंभू महाराज यांना आणले.१९८७ च्या पोटनिवडणुकीत आरएसएस आणि भाजप आणि गुजराथी बांधवांनी डॉ. प्रभू यांना मोलाचे सहकार्य केले. तर हिंदुत्व एकसंघ राहावे ही त्यांची मनापासून इच्छा होती हा किस्सा त्यांनी सांगितला. आपल्या प्रास्ताविकात लीना प्रभू म्हणाल्या की,आई आणि बाबा यांच्या कार्याचा आणि प्रेरणादायी जीवनाची झलक दाखविणारे नाट्यरूप सादरीकरणाची संकल्पना माझ्या मनात घर करून बसलेली. या पुस्तकातून अनेक मान्यवरांनी डॉ. प्रभूंचा जीवनपट उलगडला आहे. त्यांचे कार्य आजच्या पिढीला समजावे म्हणून या पुस्तकाची मराठी आणि इंग्रजी भाषेत मी आणि भाऊ अरविंदने निर्मिती केली.त्यांचे कार्य दिपस्तंभा सारखे होते. त्यामुळे त्यांच्या नावाने विलेपार्ले च्या मेट्रो स्टेशनला मंत्री अँड.आशिष शेलार आणि आमदार अँड. पराग अळवणी यांनी सहकार्य करावे असा त्यांनी आग्रह केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते महेश तपासे यांनी हिंदुत्वासाठी राजकीय हुतात्म्या स्वीकारलेले स्व. डॉ. रमेश प्रभू यांच्या प्रभू महिमा पुस्तकाचे प्रकाशन होत आहे याचा खूप आनंद व्यक्त केला आणि त्यांची आत्ये बहीण, लीना र प्रभू यांच्या मागण्या, स्व. डॉ. रमेश प्रभूंच्या नावाचं स्थान, मेट्रो स्टेशन/ हॉस्पिटल/ शाळा, कॉलेज प्रशासनाला द्यायला पाहिजे, आणि हे पुस्तक राष्ट्राच्या प्रत्येक संग्रहालय मध्ये पोस्ट करायला पाहिजे, यांना पाठिंबा दिला.



# खर्डीकर क्लासेस व रोटरी क्लबतर्फे रक्तदान शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सामाजिक बांधिलकी जोपासत खर्डीकर क्लासेस आणि रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर सपना गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आणि मोफत थॅलेसीमिया तपासणी शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. खर्डीकर क्लासेसच्या कल्याण पश्चिम येथे शिबिर पार पडले. या शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

थॅलेसीमिया तपासणीसाठीही मोठ्या संख्येने नागरिकांनी चाचणी करून घेतली, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली. रक्तदात्यांना खर्डीकर क्लासेसच्या वतीने सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि आत्मविश्वास यशाचा पाया पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमात खर्डीकर क्लासेसचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुनील खर्डीकर, प्रोजेक्ट चेअरमन एड. संकेत खर्डीकर, रोटरी क्लब अध्यक्ष गोर्धन गोलानी आणि सेक्रेटरी कवेश अहुजा यांच्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. सामाजिक जाणीवेचा संदेश देत या उपक्रमाद्वारे रोटरी क्लब आणि खर्डीकर क्लासेसने आरोग्यदायी समाजनिर्मितीचा आदर्श ठेवला.

रक्तदान हे महानकार्य आहे. एक व्यक्ती रक्तदान करून अनेकांचे प्राण वाचवू शकतो. रक्त कोणत्याही कारखान्यात तयार करता येत नाही, त्यामुळे गरजूंसाठी रक्तदाताच एकमेव आधार असतो. अशा नि:स्वार्थ दानामुळे समाजात परस्पर मदत, मानवता आणि सामाजिक बांधिलकीची भावना मजबूत होते. अशा भावना यावेळी डॉ.सुनील खर्डीकर यांनी व्यक्त केल्या.

'यहाँ के हम सिकंदर'

# कल्याणात रंगणार विशेष मुलांचा कलामहोत्सव




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण:** बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलमताई शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून विशेष कलामहोत्सवाचे आयोजन गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी कल्याणच्या मराठा मंदिर हॉल, आचार्य अत्रे रंगमंदिरा शेजारी, सुभाष मैदानाजवळ, कल्याण (प.) येथे सकाळी १० ते २ वाजेपर्यंत आयोजित केले आहे.

या महोत्सवात विशेष (दिव्यांग) शाळांचा सहभाग आहे आणि दिव्यांग बालकलाकार सहभाग घेणार आहेत. दिव्यांग मुलांच्या कला कौशल्याला वाव देण्यासाठी बाल रंगभूमी परिषदेने 'यहाँ के हम सिकंदर' कला महोत्सवाच्या माध्यमातून विशेष (दिव्यांग) बालकलाकारांना सांस्कृतिक - रंगमंच उपलब्ध करून दिला आहे. १८ वर्षाखालील बाल कलाकारांद्वारे नृत्य, नाट्य, चित्रकला, गायन, वादन यासारख्या कला सादर होणार आहेत. या महोत्सवाचे स्वरूप स्पर्धात्मक नसून महोत्सवात सहभागी सर्व शाळांना ३ हजार रुपये मानदेय, सन्मान चिन्ह व सहभागी सर्व बाल कलावंताना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक शाळेच्या एक शिक्षकाचा सन्मान केला जाणार आहे.

महोत्सवाचे उदघाटन गुरुवार १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार असून अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत तसेच यावेळी दिव्यांग मुलांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन केले आहे अशी माहिती कल्याणच्या बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे यांनी दिली.

या दिव्यांग कला महोत्सवात बालकलावंतांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी आवर्जून उपस्थित रहावे व मुलांनी बनविलेल्या वस्तू खरेदी करून त्यांचा आनंद द्विगुणित करावा असे आवाहन अध्यक्ष ॲड. निलमताई शिर्के सामंत व बाल रंगभूमी कल्याण शाखेचे सुजाता डांगे, शिवाजी शिंदे, संजय गावडे व योगेश कल्हापुरे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क योगेश कल्हापुरे मो. नं. ९२२३५०२०८२, सौरभ आरोटे - मो. नं. ८८९८५७५४६६, विशाल पितळे मो.नं. ९८१९३०५१९१, मेघा श्रृंगारपुरे मो. नं. ९८६९५४४७०८ यांना संपर्क करावे.

# वैदिक धर्म, राष्ट्रधर्म आणि शंखनाद महोत्सवाचे महत्त्व




सनातन वैदिक धर्म हा भारताचा आत्मा आहे, आणि राष्ट्राच्या अस्तित्वाचा खरा आश्रयही तोच. "यतो अभ्युदय निश्रेयस सिद्धीः स धर्मः" ही भारतीय तत्त्वज्ञानाची दिव्य व्याख्या आहे. जी जीवनाच्या दोन्ही पातळ्यांना संतुलित करते: लौकिक उन्नती आणि परमकल्याण. जगात अनेक विचारसरणी उदयास आल्या, काही प्रभावी ठरल्या, काही लयास गेल्या; परंतु मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट काय आहे, हे सांगण्याची स्पष्टता केवळ सनातन धर्माकडेच आहे. म्हणूनच भारत हे केवळ भूभागाचे नाव नसून एक सर्वश्रेष्ठ संस्कृती, एक जीवन जगण्याची तेजस्वी परंपरा, अविनाशी धर्मजीवन आहे. म्हणूनच भारत एक शाश्वत आध्यात्मिक राष्ट्र आहे.

जगातील ग्रीक, रोमन, झारची रशिया ही प्रबळ साम्राज्ये वेळोवेळी उभी राहिली आणि नष्ट झाली. परंतु भारत आजही तितक्याच सामर्थ्याने उभा आहे, कारण या राष्ट्राचे अस्तित्व राजकीय बांधणीत नसून, लोकांच्या मनातील संस्कृती, श्रद्धा, धर्मनिष्ठ मूल्ये, आणि पवित्र परंपरांमध्ये आहे. राम, कृष्ण, शिव, गाय, गंगा, मातृभूमी या सर्वांविषयीची अनुभूती आजही भारतीयांच्या चेतनेत आहे अन् हृदयामध्ये धडधडते. म्हणूनच भारत अविनाशी आहे. राष्ट्राला नष्ट करायचे अनेक प्रयत्न झाले; मात्र अवतार, संत राष्ट्रपुरुष यांनी वेळोवेळी भारताचे रक्षण केले हा इतिहास दाखवतो; आणि म्हणूनच भारताच्या धर्मजीवन, भावजीवनाचे रक्षण म्हणजे धर्मरक्षण!

आज भारत तांत्रिक, सामरिक आणि अर्थकारणात झपाट्याने पुढे जात असला, तरी दहशतवाद, नक्षलवाद, सांस्कृतिक विघातकता, अतिरेकी विचारसरणी आणि आंतरिक फूट यांसारखी अनेक आव्हाने समोर आहेत. केवळ राजकीय धोरणांनी किंवा मतांसाठी झुकणाऱ्या धर्मनिरपेक्षतेने राष्ट्र सुरक्षित राहणार नाही. राष्ट्राला जीवंत ठेवणारी शक्ती म्हणजे धर्माधिष्ठित जीवनमूल्ये, साधकता, शौर्य आणि सामाजिक बांधिलकी. म्हणूनच भारतीय राष्ट्रपुनरुत्थानाचा मार्ग सनातन धर्मातूनच जातो, हे योगी श्रीअरविंदांनी स्पष्ट केले होते.

या पार्श्वभूमीवर दिल्लीतील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून राष्ट्रचेतनेचे पुनरुज्जीवन करणारा ऐतिहासिक सोहळा आहे. १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी भारत मंडपममध्ये होणाऱ्या या महोत्सवात संरक्षण, संस्कृती, समाजजीवन, राष्ट्रीय सुरक्षा, परंपरा आणि तत्त्वज्ञान यांच्यातील संबंधांवर अभ्यासपूर्ण चर्चा होणार आहे. २५० हून अधिक विविध प्रकारची शिवकालीन शस्त्रप्रदर्शनी, पारंपरिक युद्धकलेचे प्रात्यक्षिक, विशेष तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संत-महंतांची प्रेरणा आणि 'विश्वकल्याणकारी सनातन राष्ट्र' या विषयावरचे सखोल सत्र, हे सर्व राष्ट्राला नवीन दिशा देणारे ठरणार आहे.

महाभारतात श्रीकृष्णांनी जसा धर्मयुद्धासाठी शंखनाद केला, तसा आजचा हा महोत्सवही भारताला धर्माधिष्ठित, सुरक्षित आणि जागृत राष्ट्राकडे नेणारा नवा शंखनाद आहे. प्रत्येक सनातन धर्मीयांनी हा संदेश आत्मसात करून कृतीत उतरवला, तर हा महोत्सव नवयुगाची, रामराज्याची सुरुवात ठरेल.

**- श्री. दुर्गेश परुळकर,**
**ज्येष्ठ लेखक तथा व्याख्याते**

# शिव समर्थ विद्यालयात क्रीडा महोत्सव साजरा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : शिव समर्थ विद्यालय, ठाणे प्राथमिक विभागाचा शैक्षणिक वर्षातील क्रीडा महोत्सवाचा बक्षिस समारंभ मंगळवार दि.९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता शिवदौलत सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी श्री समर्थ सेवक मंडळाचे विश्वस्त व शालेय समितीचे अध्यक्ष अनिल हजारे, श्री समर्थ सेवक मंडळाचे उपशास्ता व शालेय समितीच्या सदस्या सविता कळके तसेच शिव समर्थ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ललिता डावरे यांच्या हस्ते सांघीक व वैयक्तिक स्पर्धा, लंगडी स्पर्धा, तसेच वर्षात घेण्यात आलेल्या पेंटींग, निबंध, स्केचिंग, हस्ताक्षर स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना मेडल्स व प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी पालकांच्या ही स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यातील विजेत्या प्रथम तीन क्रमांक विजेता पालकांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

सन 2025-26 चा बेस्ट प्रिंसिपल अवॉर्ड पुरस्कार देऊन ललिता डावरे मॅडम यांना सन्मानचिन्ह (ट्रॉफी) व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुवर्णा कोळी यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पडघा येथील सेवा रस्त्यावरील समस्या आजही कायम

## शिवसेना (उबाठा) मनसे आंदोलकांच्या तोंडाला आश्वासनांची पाने पुसल्याचा आरोप



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या पडघा येथील मुंबई नाशीक महामार्गालगत असलेल्या सेवा रस्त्याची विविध कारणांनी दुर्दशा झाली असुन रस्त्यावरील समस्या आजही कायम आहेत.

पडघा हे परिसरातील गांवाचें व्यापारी केंद्रबिंदू असल्याने शेकडो वाहने, नागरीक दररोज मुंबई नाशीक महामार्गालगत असलेल्या सेवा रस्त्याचा वापर करून पडघ्यात येत असतात व महामार्गावरून विविध ठिकाणी जात असतात मात्र सेवा रस्त्याची गेल्या अनेक महिन्यांपासून विविध कारणांनी दुर्दशा झाली असुन त्यात कुरुंद फाटा त शहापूर बाजुकडील पडघ प्रवेशद्वार पंर्यत सेवा रस्ता खराब झाला असुन रस्त्यावर मोठे खड्डे पडले असुन ते सांडपाण्याचे भरले आहेत या रस्त्यालगत गाड्या धुण्यासाठी असलेल्या सर्वीस सेंटरचे पाणी रस्त्यावर वाहत आहे. तसेच या रस्त्यालगत असलेल्या तबेल्याचे शेण, पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने रस्ते चिकट होऊन वाहने घसरून अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच या रस्त्यालगत असलेल्या भंगारवाल्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्याने वाहन चालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर या रस्त्यावर रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असल्याने वाहनचालकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच आवश्यक तेथे सेवा रस्त्यांचे काम सुरू करण्यात आलेले नाही. या समस्या आजही कायम असल्याने नागरीकांच्यात संतापाची लाट उसळली आहे

**शिवसेना (उबाठा) व मनसे यांच्या वतीने महामार्ग व सेवा रस्त्याच्या विविध समस्येबाबत जुलै महिन्यात मोर्चा काढुन आंदोलन करण्यात आले होते त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधीकारी व टोल कंपनीच्या वतीने पडघा येथील विज वितरण कंपनीच्या विश्रामगृह येथील पत्रकार परिषदेत सेवा रस्त्यांवरील आवश्यक अपुर्ण कामे लवकरच सूरू होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र सेवा रस्त्याची साधी डागडुजीही करण्यात आली नसल्याने आंदोलनकर्त्यांच्यां तोंडाला नुसत्या आश्वासनांची पाने पुसल्याचा आरोप नागरीकांकडुन होत आहे.**

शिवसेना मदत कक्ष आयोजित

# एकदिवसीय महाआरोग्य शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली(शरद शहाणे)** : जिल्हा परिषद शाळा माणगाव, (मानपाडा) कल्याण शीळ रोड,येथे शिवसेना मदत कक्ष आयोजित मोफत एकदिवसीय महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गुलाब वझे ज्येष्ठ नेते, अध्यक्ष आगरी महोत्सव, आणि दत्ता वझे माजी सरपंच, यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात, नेत्रचिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, एन्जोप्लास्टी, इंजॉग्रफी हाडांचे विकार, जनरल तपासणी, इसीजी, स्त्रीरोग, बालरोग, तपासणी



आणि उपचार आणि सर्व तपासण्या आणि मोफत औषधोपचार सेवेचे आयोजन करण्यात आले होते या योजनेचा लाभ मानपाडा, उंबरली, संदप, कोळेगाव, घरीवली, येथील ग्रामस्थांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला आणि आयोजकांना मनापासून धन्यवाद दिले . या महाआरोग्य शिबिराला भेट देण्यासाठी आणि निरीक्षणासाठी शिवसेना मध्यवर्ती शाखा डोंबिवली येथून अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# बंद पेट्रोल पंपमुळे मुरबाडमधील वाहनचालक त्रस्त



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड शहरालगत एम. आय. डी. सी क्षेत्रात असलेला आदिती पेट्रोल पंप गेले पाच ते सहा दिवस बंद असल्यामुळे येथे दररोज आपल्या वाहनांमध्ये पेट्रोल भरण्यासाठी येणाऱ्या वाहनचालकांची मोठी गैरसोय होत असून प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे.

काही दिवसांपूर्वीच याच पेट्रोल पंपावर भेसळ होत असल्याची तक्रार काही ग्राहकांनी केली होती. याची दखल घेत स्थानिक प्रशासनाने सदर पंपाला सिल लावला होता. तदनंतर पुन्हा पंप सुरु करण्यात आला असे वर्षातून अनेकदा बंद होण्याचे प्रकार होत असून सदर मालक स्थानिक प्रशासनाला कोणतीही पुर्व सुचना देत नसल्याचे महसूल विभागाचे म्हणने असून महसूल विभागाने पंपाची चौकशी केली असता चौकशीसाठी आम्ही बंद ठेवला असल्याचे सदर पंप व्यवस्थापका कडून सांगण्यात आले.असे असताना वारंवार पंप का बंद राहतो यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस प्रशासनाने बजावावी अशी मागणी स्थानिक वाहन चालक व नागरिक करत आहेत.

दरम्यान तहसीलदार कार्यालय मुरबाड यांच्याशी संपर्क साधला असता पेट्रोल पंप बंद असल्याचे कोणतेही लेखी पत्र आम्हाला मालका कडुन प्राप्त झाले नाही असे सांगण्यात येत आहे.

# गिर्यारोहक भूषण पवार यांनी सर केला नागफणीचा कडा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : लोणावळा येथील सुप्रसिद्ध नागफणीचा कडा नुकताच कल्याण येथील प्रसिद्ध गिर्यारोहक आणि कल्याण गिर्यारोहक संस्था आणि रेस्क्यू संघाचे अध्यक्ष असलेले भूषण पवार यांनी सर करत कल्याण डोंबिवली शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

मागील कित्येक वर्षांपासून गिर्यारोहण तसेच दरीखोऱ्यात अपघाताचे बचाव कार्याच्या अनुभव असलेल्या भूषण पवार यांनी याआधी ही सह्याद्रीच्या खोऱ्यात असलेले अनेक कडे आणि सुळके सर करत गिर्यारोहण क्षेत्रात शहराचे नाव उंचावले आहे. नवनवीन गिर्यारोहक घडवत शारीरिक आणि मानसिक रित्या गिर्यारोहक सक्षम असावा म्हणून मार्गदर्शन करत आहेत. नुकत्याच झालेल्या नागफणीचा सुमारे ३०० फूट उंचीचा कडा आणि जमिनीपासून सुमारे अडीच हजार फूट उंच असलेला कडा सर करत पुन्हा एकदा यशाला गवसणी घालत शहराचे नाव अभिमानाने उंच केले. त्यांच्या या यशाला हिम ऑर डील संघाचे चेतन शिंदे यांनी मोलाची साथ दिली.

# आठवडी बाजारावरुन भाजपा शिवसेना आमने सामने

## बंदूकधारी बाऊन्सर घेऊन दहशत माजवित असल्याचा भाजपच्या माजी नगरसेविकेचा आरोप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शिवसेना भाजपमध्ये पक्ष प्रवेशावरुन सुरु असलेला वादंग उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या एकत्रित आल्यानंतर संपुष्टात आल्याचे चित्र दिसत असताना आत्ता आठवडी बाजारावरुन दोन्ही पक्षाचे पदाधिकारी व इच्छुक उमेदवार आमने-सामने आले आहेत. त्यांच्यामध्ये आरोप प्रत्यारोप केले जात आहे. कल्याण डोंबिवलीतील प्रभाग क्रमांक ३० मध्ये आठवडी बाजारावरुन भाजपच्या माजी नगरसेविका रविना माळी आणि शिंदे



गटाचे पदाधिकारी अर्जून पाटील यांच्या वादंग सुरु झाला आहे. दोघांनी एकमेकांवर गंभीर आरोप केले आहेत. भाजपा कार्यालयाच्या समोर जबदरस्तीने आठवडी बाजार भरविला गेला आहे. शिवसेना पदाधिकारी अर्जून पाटील हे बंदूकधारी बाऊन्सर घेऊन दहशत माजवित असल्याचा आरोप भाजपच्या माजी नगरसेविका रविना माळी यांनी केला आहे. आठवडी बाजाराला आमचा विरोध नाही,मात्र त्यांनी हे दुसऱ्या ठिकाणी लावावे. या प्रकरणात माळी यांनी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्याशी भेट घेऊन निवेदन दिले आहे आणि कारवाईची मागणी केली आहे.तर माझ्याकडे ही सुरक्षा २५ वर्षापासून आहे. मी कोणाच्या ऑफिस समोर आठवडी बाजार लावला नाही. नागरीकांची मागणी होती म्हणून हा बाजार लावला आहे. त्यात माझा काही फायदा नाही. खासदार श्रीकांत शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत भोपर टेकडीत कार्यक्रमाची गर्दी पाऊन विरोधकांच्या पाया खालची वाळू सरकली आहे. निवडणूक आली म्हणून हे आरोप केले जात असल्याचे अर्जून पाटील यांनी सांगितले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



गुरुवार
११ डिसेंबर २०२५

**मेष**
म्हाला वरिष्ठांकडून आणि कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल. आज तुम्ही रिअल इस्टेटबाबत महत्त्वाचे निर्णय घ्याल.

**वृषभ**
नोकरीमुळे अनेक बदल घडतील. कठोर परिश्रमाने यश मिळेल, पण मन लावून मेहनत करा. आर्थिक निर्णय जपू घ्या, मोठे खर्च काही काळासाठी पुढे ढकला.

**मिथुन**
स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अनुकूल काळ आहे. मुलं आणि कुटुंबातील इतर सदस्य त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी तुमच्यावर अवलंबून राहतील.

**कर्क**
कामाच्या ठिकाणी बढती किंवा प्रशंसा मिळण्याची शक्यता आहे. जे व्यवसायात असतील ते नव्या संधी शोधतील. मनासारखं काम मिळेल.

**सिंह**
पैसा जपून खर्च करा. ऑफिसमधील तुमचे काम कौतुकास्पद असेल. चांगल्या ठिकाणी बदलीची सूचना मिळू शकते. गुंतवणूक करणे चांगले नाही.

**कन्या**
आर्थिक फायदा होईल, परंतु खर्चही वाढेल. आज नशीब तुमच्या बाजूने आहे. फायदेशीर योजना आखली जाईल. विशिष्ट गोष्टीचा अभ्यास करण्यात वेळ जाईल.

**तुळ**
तुम्हाला आनंद मिळेल. तुमच्या वक्तृत्व कौशल्यामुळे अनेक यश मिळतील. बहुप्रतिक्षित काम पुढे जाईल, समाधाना वाटेल. टेन्शन कमी होईल.

**वृश्चिक**
आर्थिक परिस्थिती सुधारेल. तुमच्या कारकिर्दीत तुम्हाला समाधान मिळेल. परदेशातील संपर्क फायदे देतील. तुमच्या विरोधकांची संख्या वाढेल.

**धनु**
नवीन कामगिरीवर लक्ष केंद्रित करा. नवीन प्रकल्पावर काम करणे चांगले ठरेल, हमखास यश मिळेल. नवं वाहन घेण्याचा प्लान अखेर आज पूर्ण होईल.

**मकर**
जुन्या मित्राशी संपर्क तुम्हाला आनंद देईल. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. नवीन वाहन खरेदी कराल, चांगला दिवस आहे. तवणुकीचा चांगला मोबदला मिळेल.

**कुंभ**
चांगला नवा जॉब मिळेल. भेटवस्तू आणि सन्मान वाढतील. सरकारी मदत मिळेल. तुमच्या कारकिर्दीत प्रगती होईल.भेटवस्तू आणि सन्मान वाढतील.

**मिन**
सरकारी मदत मिळेल. तुमच्या कारकिर्दीत प्रगती होईल. तुमच्या प्रगतीमुळे तुमच्या जीवनातील सर्व पैलूंमध्ये एक नवीन तेज येईल. आर्थिक परिस्थिती मजबूत असेल.



# कल्याणच्या गिरिजेश रजकची रशियामध्ये सुवर्ण कामगिरी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टिंग फेडरेशन मार्फत रशिया मॉस्को येथे वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप नुकतीच आयोजित करण्यात आली होती. त्यात कल्याणच्या गिरिजेश रजक हिने पूर्ण पॉवरलिफ्टिंग मध्ये सुवर्ण पदक, बेंच प्रेस मध्ये सुवर्ण पदक आणि डेडलिफ्ट ह्या प्रकारात सुवर्ण पदक असे ३ सुवर्ण पदक पटकावले. या स्पर्धेमध्ये जागतिक पातळीवर बऱ्याच देशाच्या खेळाडूंनी भाग घेतला होता. चीन, जपान, कोरिया, भारत, दुबई, साउथआफ्रिका असे अनेक देश सहभागी झाले होते. गिरिजेश रजक हि आंबिवलीच्या अल्फा जीम मध्ये सराव करत असून प्रशिक्षक सोनू पाटील यांचं मार्गदर्शन लाभत आहे.

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
## प्रभाग समिती क्र. ४

**जा.क्र. उमपा/सहा.आ/प्र.स ४/५१२/२०२५**
**सहायक आयुक्त, प्र.स ४ कार्यालय,**
**उल्हासनगर महानगरपालिका,**
**उल्हासनगर-४२१००५.**
**दिनांक : ९/१२/२०२५**

**नोटीस**

**(महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(३) अन्वये)**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ चे हद्दीत खाली नमुद केलेल्या ठिकाणी वृक्ष छाटणेसाठीचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर ठिकाणी असणाऱ्या झाडांच्या फांदया छाटणेसाठी मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव वृक्ष अधिकारी तथा सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.४ यांनी वृक्ष प्राधिकरणाच्या सभेपुढे ठेवण्याचे योजिले आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | ठिकाण | झाडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | झाडाची जात | फांदयाचा संख्या | फांदयाची लांबी | फांदयाचा व्यास |
| १ | श्री. हरिराम टी लुंड | ब्लॉक नं स ४८/९६ बालाज हॉस्पिटल समोर, कुर्ला कॅम्प रोड उल्हासनगर-४२१००४ | जंगली | ०२ | सुमारे १० फुट | १.२ फुट |
| | | | | ०२ | सुमारे १५ फुट | १.१ फुट |

उक्त नमुद केलेल्या ठिकाणी असलेले वृक्षांच्या फांदया छाटणेसाठी कोणत्याही इसमाची हरकत आल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात दिनांक १७/१२/२०२५ पूर्वी सहायक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी प्रभाग समिती क्र.४, अग्निशमन इमारत, उल्हासनगर-४२१००५ या कार्यालयात सादर करावी. मुदतीत लेखी हरकत प्राप्त झाल्यास संबधितास सुनावणी देऊन अंतीम निर्णय घेतला जाईल, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास प्रस्तुत प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**(अलका पवार)**
**वृक्ष अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**प्रभाग समिती क्र. ४**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**जा.क्र. उमपा/पीआरओ/२२८/२०२५**
**दिनांक : १०/१२/२०२५**

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
## सार्वत्रिक निवडणूक-२०२५

**-: प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्धी बाबत :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दि. २६/११/२०२५ रोजीच्या मतदार यादीच्या कार्यक्रमानुसार दिनांक १०/१२/२०२५ रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार होत्या. मात्र मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि. ०९/१२/२०२५ रोजीचे पत्रान्वये दिल्याप्रमाणे मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | दि.२६/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेला दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिद्ध करणे | १०/१२/२०२५ | १५/१२/२०२५ |
| २ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | १५/१२/२०२५ | २०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे | २२/१२/२०२५ | २७/१२/२०२५ |

**ठिकाण: कल्याण**
**दिनांक: १०/१२/२०२५**

**जा. क्र. कडोंमपा/ जसंवि/मूका/७७१**
**दिनांक : १०/१२/ २०२५**

**सही-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

# सात वर्षीय सारा वर्तकचे गेटवे ऑफ इंडिया अवघ्या ९ तासात पोहून पार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : केवळ ७ वर्षांची सारा अभिजीत वर्तक हिने इतिहास रचत धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया हे तब्बल ३६ किमी समुद्र पोहून फक्त ९ तास ३६ मिनिटांत पूर्ण केले. ती या आव्हानात्मक समुद्री मार्गावर पोहणारी सर्वात लहान जलतरणपटू ठरली आहे. ती अलिबाग तालुक्यातील फोफेरी गावची कन्या आहे.

या महान कामगिरीमागे तिचे किशोर पाटील आणि सूरज लोखंडे यांचे अथक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि मानसिक बळ यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी सारामध्ये आत्मविश्वास निर्माण करत तिला प्रत्येक आव्हानावर मात करण्याची ताकद दिली.या महान यशाच्या क्षणी तिचे आई वडील वैष्णवी आणि अभिजीत वर्तक हे आनंदाने आणि अभिमानाने भावूक झाले. मुलीच्या धैर्याचा आणि चिकाटीचा क्षण प्रत्यक्ष अनुभवताना त्यांचे डोळे पाणावले. तिचे गेट वे ऑफ इंडिया येथे स्वागत करण्या साठी राजाराम गावंड, अनंत वर्तक, आशा अनंत वर्तक, जितेंद्र वर्तक, उमेश वर्तक,स्वप्निल म्हात्रे,बालनाथ मोकल आणी कुलाबा पोलीस ठाण्यातील वरीष्ठ अधिकारी, कुटुंबीय व मित्र परिवार हजर होते..

साराच्या यशाची बातमी गावात पोहोचताच फोंफेरी गावात आनंदाचा जल्लोष उसळला. गावकऱ्यांनी अभिमानाने तिचे स्वागत केले.समुद्राच्या सतत बदलणाऱ्या प्रवाहांना, वाऱ्याला आणि उंच लाटांना तोंड देत साराने दाखवलेले धैर्य खरोखर प्रेरणादायी आहे.साराच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भिवंडी रस्ता रुंदीकरणातील बाधितांना नुकसान भरपाई मिळावी

## - आमदार रईस शेख यांची विधानसभेत मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : ठाणे भिवंडी कल्याण मेट्रो प्रकल्पासह शहरातील वाहतूक कोंडीवर उपय योजना करण्यासाठी महापालिकेने विकास आराखड्यात नमूद ३६ मीटर पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यास सुरुवात केली आहे.परंतु पालिका बाधित मालमत्ता धारकांना कोणतीही नुकसान भरपाई देत नसल्याने अनेकांमध्ये रोष आहे.रस्ता रुंदीकरण कार्यात नागरिकांनी सहकार्याची भूमिका घेतली पण बाधित मालमत्ता धारकांना मोबदला देण्या बाबत कोणतीही उपाययोजना न करता भिवंडी महापालिकेने ही कारवाई केली आहे.त्यामुळे निवासी बाधितांना टाटा आमंत्रा येथे निवासाची व्यवस्था करावी त्यासोबत बाधित मालमत्ता धारकांना मोबदला देताना त्याचा लाभ जमीन मालक व त्यावरील मालमत्ता धारक



यांना ही देण्यात यावा.तसेच सरकारी जमिनी वरील मालमत्ता धारकांना सुद्धा त्याचा लाभ मिळावा अशी मागणी भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार रईस शेख यांनी सुरू असलेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनात विधानसभा सभागृहात केल्याची माहिती दिली. मुबई येथे एमएमआरडीए कडून नुकसानग्रस्तांना ज्यापद्धतीने मोबदला दिला जातो तसाच मोबदला भिवंडी येथील बाधितांना द्यावा त्यासाठी आठवडा भरात त्या संदर्भात बैठक आयोजित करावी अशी मागणी रईस शेख यांनी केली आहे.

# प्रभागातील विविध समस्यांबाबत माजी नगरसेवक कुणाल पाटीलांनी घेतली आयुक्तांची भेट


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रांतील प्रभाग क्र. १७ मधील मुख्यत्वे पाणी समस्या यांसह इतर विविध समस्यांबाबत माजी नगरसेवक कुणाल पाटील यांनी केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांची भेट घेतली. यावेळी आयुक्तांनी या समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.



प्रभाग क्र. १७ मधील देशमुख होम्स परिसरात गेल्या काही काळापासून पाणीपुरवठ्याची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सध्या अस्तित्वात असलेली चार इंचांची पाण्याची लाइन एमआयडीसीकडून अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवते. त्यामुळे नागरिकांना आवश्यक तेवढे पाणी मिळत नसून दैनंदिन गरजा पूर्ण करण्यात मोठी अडचण येत आहे. त्यामुळे देशमुख होम्म येथे योग्य क्षमतेची नवीन पाण्याची लाईन टाकून द्यावी जेणेकरून परिसरातील नगरिकाना पाणी समस्या दूर होईल. त्याचप्रमाणे प्रभाग क्र. 17 येथील नेताजी नगर, देशमुख होम्स, आडीवली, आडीवली टेकडी परिसर फेज-3, गोळवली, पिसवली, मल्हार नगर येथील रस्ते दुरुस्ती व पाथदिवे बसविण्याबाबत देखील यावेळी मागणी करण्यात आली.

या प्रभागातील रस्त्यांची सद्यस्थिती अत्यंत खराब आहे. अनेक रस्ते खड्डेमय व निकृष्ट अवस्थेत असल्याने नागरिकांना दैनिक प्रवासात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच या भागातील अंतर्गत रस्त्यांवर पाथदिवे उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना संध्याकाळी व रात्री अंधारात प्रवास करावा लागतो, ज्यामुळे चोरी, लूटमार आणि इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे प्रभागातील नागरिकांच्या सुरक्षितता, दैनंदिन जीवनमान व परिसर विकासासाठी प्रभाग क्र. 17 मधील सर्व रस्त्यांची दुरुस्ती किंवा नव्याने बांधकाम करण्यास तातडीने कारवाई करावी. संपूर्ण प्रभागातील अंतर्गत रस्त्यांवर पाथदिवे बसविण्यात यावेत, जेणेकरून नागरिकांचे सुरक्षित प्रवास सुनिश्चित करता येईल. या कार्यवाहीमुळे नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होईल तसेच प्रभागातील सार्वजनिक सुरक्षितता आणि सुविधा सुधारण्यात महत्त्वपूर्ण योगदान होईल अशी प्रतिक्रिया कुणाल पाटील यांनी दिली.तर याबाबत कमी दाबाने येणारा पाणीपुरवठा यासाठी प्रयत्न करू, अमृत योजनेचे काम जलद गतीने करत रस्ते, दूषित पाणी याबाबत पाहणी मार्ग काढू. पथदिवे यांचे टेंडर काढले आहे लवकरच बसविण्यात येतील असे आश्वासन केडीएमसी आयुक्तांनी यावेळी दिले. दरम्यान येणाऱ्या निवडणुकीला समोरे जाताना आयुक्तांनी 27 गावांना भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याची मागणी पाटील यांनी केली.



# हिवाळी अधिवेशनात ‘लव्ह जिहाद विरोधी कायदा’ झालाच पाहिजे

## – महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांतील १६० हून अधिक संघटनांची मागणी


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महाराष्ट्रात वाढत्या ‘लव्ह जिहाद’ प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर २० जिल्ह्यांतील १६० हून अधिक हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी एकत्र येत राज्य सरकारकडे चालू हिवाळी अधिवेशनात कठोर ‘लव्ह जिहाद विरोधी कायदा’ लागू करण्याची जोरदार मागणी केली आहे. या आंदोलनात १६०० पेक्षा अधिक हिंदुत्वनिष्ठांनी सहभाग घेऊन महिलांच्या सुरक्षेसाठी उत्तर प्रदेश–राजस्थान धर्तीवरील कायदा महाराष्ट्रात तात्काळ लागू करण्याची मागणी करण्यात केली.




जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, नागपूर, सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी २० जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने महिला व हिंदुत्वनिष्ठांनी एकत्रित येत स्थानिक जिल्हा आणि तालुका प्रशासनाला तसेच स्थानिक लोकप्रतीनिधींनाही निवेदने दिली.

संघटनांच्या प्रतिनिधींनी राज्यपाल, मुख्यमंत्री व गृह विभागाला दिलेल्या निवेदनात लव्ह जिहादला बळी पडलेल्या हिंदू युवतींच्या विविध घटनांचा उल्लेख केला आहे. नगर येथील ७ वीत शिकणाऱ्या मुलींवर झालेला सामूहिक अत्याचार, कोल्हापूर इचलकरंजी येथे ६ वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार, शाहुवाडीतील १४ वर्षीय मुलीवर बलात्कार, तसेच श्रद्धा वालकर, रुपाली चंदनशिवे, तनुश्री शर्मा यांच्या हत्या प्रकरणांचा संदर्भ देत ‘लव्ह जिहाद’ ही वैयक्तिक गुन्हेगारी नसून संघटित कट असल्याचे नमूद केले आहे.



देशातील उत्तर प्रदेश, गुजरात, मध्यप्रदेश, आसाम, उत्तराखंड या राज्यांनी जबरदस्तीने होत असलेले धर्मांतर व फसवणूक रोखण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत.

महाराष्ट्र राज्यही उत्तर प्रदेश व राजस्थान राज्यांच्या धर्तीवर लव्ह जिहाद विरोधी कायद्यात आजन्म कारावासाची तरतूद असावी, गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र घोषित करावेत, तक्रार करण्याचा अधिकार पीडितांसह कोणत्याही नागरिकाला असावा, विशेष पोलीस शाखा आणि ‘रणरागिणी’ पथकाची स्थापना करावी, विदेशातून येणारा निधी, जिहादी नेटवर्क आणि तस्करीचा सखोल तपास करून मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, जलद तक्रारींसाठी हेल्पलाइन क्रमांक प्रसारित करावा आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

### जनभावनांना प्रतिसाद देत आमदार-मंत्र्यांकडून लव्ह जिहाद व अँटी लँड ग्रॅबिंगकायद्यासाठी आश्वासन

लव्ह जिहाद विरोधी कायदा आणि अँटी लँड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायद्याविषयी राज्यभरातील विविध आमदार, मंत्री आणि लोकप्रतिनिधींना निवेदने देण्यात आली. या निवेदनांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे निदर्शनास आले आहे. मंत्री गुलाबराव पाटील, आमदार अमोल जावळे, सुरेश भोळे, अनुप अग्रवाल, प्रवीण दटके, कृष्णाजी खोपडे, तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे, विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, किशोर जोरगेवार, करण देवतळे, देवराव भोंगळे, सुधीर मुनगंटीवार, विक्रमसिंह पाचपुते आणि खासदार अनुप धोत्रे आदींनी या विषयात गंभीर भूमिका घेतली. अनेक लोकप्रतिनिधींनी हा कायदा करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलण्याचे आश्वासन दिले असून काहींनी यासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना आणि मुख्यमंत्री यांना पत्र पाठवण्याचे आश्वासनही दिले आहे. सर्वांनी मिळून या दोन्ही महत्त्वपूर्ण कायद्यांसाठी सकारात्मक भूमिका व्यक्त केली आहे.



# ‘गांजा’ विक्रीच्या प्रयत्नात दोघे जेरबंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ‘गांजा’ सारख्या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी फिरत असलेल्या दोघांना अटक करण्यात ठाणे ग्रामीण पोलिसांनी मोठे यश मिळवले आहे. अंमली पदार्थ विक्रीबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर ठाणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही कारवाई करून 4 किलो 52 ग्रॅम वजनाच्या रु. 1 लाख 20 हजार किंमतीच्या गांज्यासह दोघांना अटक केली. अशी माहिती ठाणे ग्रामीण पोलीसांनी दिली आहे.

ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक डि. एस. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलिस अधीक्षक अमोल मित्तल यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप गिते यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हा सापळा रचला.

# उर्जा संवर्धन सप्ताह निमित्त केडीएमसीची जय्यत तयारी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : दि.१४ डिसेंबर ते दि.२१ डिसेंबर या ऊर्जा संवर्धन सप्ताहासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने संपूर्ण आठवडाभर विविध जनजागृती उपक्रमाचे आयोजन केले असून, शाळा, कॉलेज, रहीवासी सोसायटी, रेल्वे स्टेशन, सरकारी कार्यालये व सार्वजनिक ठीकाणी ऊर्जा बचत, उर्जा कार्यक्षमता व सौर उर्जा वापराबाबत कल्याण डोंबिवली शहरामधील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

दि.१४ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून सायकल रॅलीला महापालिका आयुक्त अभिनव गोयल ध्वजांकीत करणार आहेत. विद्युत विभागाने उर्जा बचत, उर्जा कार्यक्षमता व सौर उर्जा वापराच्या जनजागृती कामी विभागाने तयार केलेल्या आकर्षक माहिती फलकाचे अनावरण सुध्दा महापालिका आयुक्तांच्या हस्ते होणार आहे.सायकल रॅली साठी २५० सायकल वीर यांनी नोंदणी केली असून सायकल वीर यांना आकर्षक टीशर्ट व आकर्षक मेडल सुद्धा देण्यात येणार आहे. सायकल रॅली ही कल्याण व डोंबिवली शहरातून मार्गक्रमण करणार असून कल्याण व डोंबिवली शहरातील नागरीकांमध्ये ऊर्जा बचत, ऊर्जा कार्यक्षमता व सौर ऊर्जा वापर बाबत जनजागृती करणार असल्याची माहिती महापालिका विद्युत व यांत्रिकी विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता तथा नोडल अधिकारी सायकल उपक्रम प्रशांत भागवत यांनी दिली.तसेच १४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता रोटरी भवन येथे सोसायटी इमारतींसाठी शाश्वतता आणि सुरक्षिततेसाठी केडीएमसीचे पाऊल या चर्चासत्राचे आयोजन केले असून फ,ग, ह प्रभागक्षेत्रातील रहीवासी संकुल सोसायटीचे पदाधिकारी यांचे सोबत महापालिका आयुक्त संवाद साधणार आहेत.

**विविध उपक्रमातून नागरीकांमध्ये करणार ऊर्जा बचत, ऊर्जा कार्यक्षमता व सौर ऊर्जा वापराबाबत जनजागृती**

चर्चा सत्रात शाश्वतचे ५ विषय १) कचरा व्यवस्थापन २) सौर ऊर्जेचा वापर ३) पावसाचे पाणी साठवणे ४) सांडपाण्याचा पुनर्वापर ५) वृक्षारोपण व सुरक्षितता चे २ विषय विद्युत सुरक्षा ऑडिट व अग्निसुरक्षा बाबत पदाधिकारी यांना माहिती महापालिकेच्या विविध विभागाचे नोडल अधिकारी देणार आहेत.

ऊर्जा संवर्धन सप्ताह मध्ये महापालिका क्षेत्रातील शाळा, कॉलेज, रहिवासी सोसायटी, सरकारी कार्यालये, रेल्वे स्टेशन व सार्वजनिक ठिकाणी ऊर्जा बचत, ऊर्जा कार्यक्षमता व सौर ऊर्जा वापर बाबत जनजागृती करण्यासाठी महापालिका विद्युत विभागाने दि.१५ डिसेंबर रोजी सरकारी कार्यालये, दि.१६ १७ व दि.१८ डिसेंबर रोजी शाळा व कॉलेजेस दि.१९ डिसेंबर रोजी रेल्वे स्टेशन दि.२० व दि.२१ डिसेंबर रोजी रहिवासी सोसायटीमध्ये विविध उपक्रम घेणार असल्याचे व तसेच महापालिका विद्युत अभियंता यांच्यासाठी ऊर्जा संवर्धन विषयावर चर्चा सत्राचे सुद्धा आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती प्रशांत भागवत यांनी दिली आहे.

# मुरबाडच्या आजीबाई शाळेची ऐतिहासिक अयोध्यावारी



**आम्ही आजीबाई शाळेतील विद्यार्थिनी आज आयुष्यात पहिल्यांदाच सिद्धेश लोकरे यांच्या माध्यमातून विमान प्रवास करून श्रीरामाच्या दर्शनासाठी अयोध्याला जात आहे. याचा आम्हाला खुप आनंद वाटत आहे.**
**- पार्वतीबाई केदार**
**वय 72 वर्षे**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील प्रसिद्ध आजीबाई शाळेचा इतिहासात पहिल्यांदाच एक अनोखा आणि प्रेरणादायी क्षण उजाडला आहे. कै. मोतीराम गणपत दलाल चरिटेबल ट्रस्ट संचलित फांगणे येथील आजीबाईच्या शाळेतील आजीबाईची विमानाने अयोध्यावारी सोमवारी, दि.8 डिसेंबर 2025 रोजी सायंकाळी 5 वाजता मुंबई विमानतळहून निघाली. प्रभू श्रीरामचरणाचे दर्शन घेण्याचा हा अविस्मरणीय क्षण समाजसेवक सिद्धेश लोकरे यांच्या विशेष प्रयत्नांतून साकार झाला आहे.

वयाची साठ, सत्तर पायरी ओलांडलेल्या ग्रामीण भागातील जवळपास 24 आजीबाईंना विमान प्रवासाची संधी मिळणे, हे एक उल्लेखनीय आणि हृदयस्पर्शी पर्व ठरत आहे. आपल्या पिढीच्या आयुष्यात कदाचित कधीच न अनुभवलेला हा क्षण जणू त्यांच्या आयुष्यातील सुवर्ण क्षण आज साकारत आहे. आजीबाई शाळेच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे आयुष्याकडे नव्या दृष्टीकोनातून पाहत पुन्हा शिकण्याची ओढ जोपासणाऱ्या या आजीबाईंना अयोध्येच्या पवित्र भूमीत श्रीरामचरण दर्शनाची संधी मिळणे हा एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मेळावा ठरणार आहे.

या यात्रेची खास वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदाच आजीबाई विमानप्रवास करणार आहेत. विमान प्रवासाची कल्पना जरी त्यांच्यासाठी रोमांचकारी असली तरीही त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, आतल्या भावविश्वात निर्माण झालेली उत्सुकता आणि प्रभू श्रीरामचरणांप्रती असलेली भक्ती हे सर्व पाहण्यासारखे आहे. फांगणे गावातील ग्रामस्थ, शाळेचे शिक्षक, ट्रस्टचे पदाधिकारी आणि नातेवाईक यांनी आजीबाई विद्यार्थिनींना शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील अवलिया म्हणून ओळख असलेले सिद्धेश लोकरे यांनी 'मिशन 30-30-3' हाती घेतले आहे. म्हणजे या मोहिमेत 30 दिवसांत 30 शाळांमध्ये तीन कोटी रुपये खर्चुन भौतिक सुधारणा करण्याचा त्यांचा संकल्प आहे. आता मुरबाड च्या आजीबाईंना अयोध्यावारी पाठवण्याचा हा उपक्रमही त्याच सामाजिक जाणिवेचा एक भाग असून सर्वत्र या कार्याचे कौतुक होत आहे.यासाठी आजीबाई शाळेचे संकल्पक योगेंद्र बांगर यांनी ही यात्रा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

आजीबाई शाळेची ही यात्रा फक्त अयोध्येची यात्रा नाही, तर एका संपूर्ण पिढीला दिलेला आदर, प्रोत्साहन आणि सन्मान आहे. पुस्तकात परतलेली, ज्ञानाची आवड पुन्हा आणि आता आकाशाला स्पर्श करणारी आजीबाई ची कहाणी मुरबाड तालुक्यासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी ठरत आहे.

# खर्डी येथे महिला विकास मंचाच्या वतीने महिलांसाठी समुपदेशन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**खर्डी** : जीवनदीप शैक्षणिक संस्था, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथे महिला विकास मंचाच्या वतीने दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य हा समुपदेशन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करण्यात आली. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर डॉ. मोहिनी भिसे यांनी आहार, व्यायाम, तणाव व्यवस्थापन व मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व प्रश्नोत्तर सत्रातून शंकांचे निरसन झाले. कार्यक्रमामुळे आरोग्यविषयक जागरूकता वाढली. या कार्यक्रमात विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे यांच्या प्रेरणेने व प्राचार्य कैलास कळकटे सरांच्या मार्गदर्शनाने सदर कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महिला विकास मंचाच्या सर्व सदस्यांनी मनःपूर्वक प्रयत्न केले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन SYBsc IT ची विद्यार्थिनी कु. माया मोंडुला हिने केले, तसेच प्रास्ताविक प्रा.रजनी परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दिपाली भोईर यांनी केले

महिला विकास मंचाच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# रस्त्यावरील धुळीने भिवंडीकर हैराण
## खोकला, श्वसनाचे आजार बळावले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : शहरासह ग्रामीण भागात सध्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असून खड्डेमय रस्त्यावरून उडणाऱ्या धुळीने या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांसह भिवंडीकर हैराण झाले आहेत. रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीने शहर व ग्रामीण भागातील वायू प्रदूषणात प्रचंड वाढ झाली असल्याने महिला,शालेय विद्यार्थी व प्रवासी पादचारी नागरिकांना खोकल्याचा व श्वसनाचा त्रास जाणवू लागला आहे.त्यामुळे महापालिका प्रशासनाने याबाबत उपाययोजना करावी अशी मागणी भिमशक्ती संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.



भिवंडी शहरात अंजुर फाटा ते कल्याण नाका दरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे त्यामुळे शहरात बांधकामांवर हातोडा पडत आहे.या पाड कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मातीचे ढीग पडले आहेत त्यामुळे वादळ वाऱ्यामुळे रस्त्यावरील धूळ प्रचंड उडत आहे. त्यामुळे शहरात प्रदूषण निर्माण झाले आहे.परिसरात राहणाऱ्या नागरिंकाना या धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. घरात सुध्दा धुळ साचत असल्याने खोकला व इतर आजार सहन करावा लागत आहेत त्याच बरोबर

भिवंडी वाडा रस्त्याबरोबरच भिवंडी अंजुर फाटा चिंचोटी महामार्ग,अंजुर फाटा ठाणे महामार्ग,भिवंडी पारोळ महामार्ग या रस्त्यांवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याने रस्त्या वरून प्रचंड धूळ उडत आहे.या धुळीमुळे रस्त्यावर दृश्यमानता कमी होण्याने अनेकाना वाहन जपून चालवावी लागत असतानाच या उडणाऱ्या धुळीमुळे अनेकजणांना खोकला ,श्वसनाचे आजार जडत असल्याने रस्त्यातून प्रवास करताना नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.याबाबत प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी भीमशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुरेश मस्के,एस मोहम्मद अंसारी,प्रभाकर जाधव यांनी केली आहे.

# विकतचे पाणी म्हणजे निसर्गाचा अपमान आणि प्रशासनाचे अपयश

**- सी. आर.म्हात्रे**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : एकेकाळी गावागावात पाणवठे जिवंत होते,विहिरीच्या थंड पाण्याचा गारवा होता,ओढ्याच्या आवाजाची लय होती ,नदीच्या वाहणाऱ्या पाण्यात जीवनाची चैतन्यधारा होती. आज त्याच देशात हातात प्लास्टिकची पाण्याची बाटली,खिशात पैसे नसतील तर एक पाण्याचा थेंब फुकट मिळेल याची खात्री नाही.मोफत मिळणाऱ्या नैसर्गिक देणगीवर पैसे मोजायला लागणे ही परिस्थिती नाही तर ही विकासाच्या नावावर आपण केलेल्या चुकांचा चरम बिंदू आहे अशी खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केली आहे

आज विकतचे पाणी हे आपण आधुनिकतेचे प्रतीक मानावे की निसर्गाचा अपमान की प्रशासनाच्या पराभवाचे प्रमाण मानायचे हा प्रश्न केवळ विचाराचा नाही तर तो प्रत्येकाच्या अंतर्मनाला भोसंकणारा आहे. कारण पाण्याचा खर्च वाढतोय,तर दुसरीकडे पाणी साठवण्याची खंत वाढत आहे .पाऊस कमी नाही पण ते हरवले कसे हा प्रश्न पडला आहे. भारतात विशेषतः आपल्या महाराष्ट्रात कोटी कोटी घन मीटर पाऊस पडतो,पावसाचे प्रमाण कमी नाही तर आठवण क्षमता कमी आहे. त्याचे व्यवस्थापन केले जात नाही. तलाव,धरणे नद्या गाळाने भरल्या आहेत, त्याची गुदमरणारी अवस्था,आणि दिवसेंदिवस पाण्याची भूगर्भ पातळी कमी होत आहे.तर दुसरीकडे सिमेंटच्या जंगलांची वाढ होत आहे. या सर्वांचा परिपाक म्हणजे पाण्याची नैसर्गिक साखळी मोडली आहे.

विकासाच्या नावाखाली तळी बुजवली,तेथे भव्य इमारती उभ्या राहिल्या,नद्या प्रदूषणाने प्रदूषित झाल्या,रस्ते रुंदवले मात्र नाले बंद झाले.पावसाचे पाणी थेट समुद्रात . प्रशासन योजना आखते,फोटोशूट करतो,पण प्रत्यक्ष कामाचा बोजवारा उडालेला दिसतो.योजनेत कोठेही प्रामाणिक पारदर्शकता नाही.पाणी फाऊंडेशन चे पुरस्कार घेतले जातात मात्र घराघरात पाणी टँकरचे असते.टँकर लॉबी हा शाप आहे,मात्र तोच काहीना वरदान ठरला आहे असेही सांगितले.

आज प्रत्येक गावाला टँकरचे पाणी हा एक समाधानाचा पर्याय आहे. पण खरोखरच हे पाणी शुद्ध आहे का? तो कोठून आणला जातो,ते टँकर स्वच्छ केले जात आहे का यातून हे विविध प्रश्न निर्माण होतात. पाणी मिळत नाही म्हणून विचारले तर प्रशासन उत्तर देते टँकर येईल,टँकर पाठवितो हे काय नक्की समजायचं असे सांगितले.

घरातील खर्चात पाणी बजेट मोठा ठरत आहे. एका कुटुंबाला महिन्याला १५०० ते ३००० हजार रुपये खर्च करायला लागतो.हाच होणारा खर्च पाणी संवर्धनासाठी वापरला तर भविष्यात मोठी बचत होऊ शकतो. विकतचे पाणी म्हणजे गरज नव्हे तर मजबुरी आहे,जेथे मजबुरी तेथे शासनाचे अपयश हे समजावे.पण जनता जनार्दन मौन बाळगून असते.पाणी विकत घेणे हा विकास का पाणी व्यवसाय .शहरे वाढतात,उद्योग वाढतात पण पाण्याची सोय विचारात न घेता रिअल इस्टेट. वाढणाऱ्या वसाहतींना पाणी पुरवठा करता करता सामान्य शेजारी,जनता यांना वाऱ्यावर सोडले जाते,त्याचा नशिबी अशुध्द पाणी दोन दिवसा आड. विकतच्या पाण्याच्या बाटलीचे झाकण काढता तो नफा मात्र ठराविक लोकांच्या खिशात जातो. आपण पाणी वापरणारे ग्राहक झालो उपभोक्ता नव्हे तर नफेखोरांच्या बाजारात हक्काचे बंदिस्त नागरिक झालो याला काय म्हणावे.

पाऊस खूप,त्याची योग्य साठवणूक झाली तर पुढील टंचाईचे विघ्न दूर होईल सरकारी निधी आहे मात्र त्या योजना पूर्ण करणारे डोके काम करत नाही. गावागावातील जूने तलाव,विहिरी यांचा पुनर्वापर झाला पाहिजे.नद्या,धरणे गाळ मुक्त झाली पाहिजे.जलसंधारण योजना कागदावरच न ठेवता अंमलबजावणी झाली पाहिजे. उद्योगात पाण्याचा पुनर्वापर झाला पाहिजे.राजकारणापेक्षा जलनीतीवर जास्त लक्ष दिले पाहिजे. संकट पाण्याचे नाही तर मानसिकतेचे आहे.निसर्ग आपल्याला मोफत पाणी देते,मात्र आपण तेच पाणी दुकानदारांकडून विकत घेतो ,ज्या देशात गंगेला माता मानतात त्याच देशाची ही अवस्था .विकतचे पाणी हे आधुनिकतेचे लक्षण नसून निसर्ग आणि प्रशासन यांच्या विश्वासाचे हरवलेले द्योतक आहे.

जर भविष्यात पाणीबाणी यायची नसेल तर सर्वांनीच जागृत झाले पाहिजे असे भावनिक आवाहन सी आर म्हात्रे यांनी केले आहे.

# केडीएमसी शिक्षण विभाग समूह साधन केंद्राअंतर्गत विज्ञान प्रदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील तिसाई विद्यालय या ठिकाणी केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग, समुह साधन केंद्र -१८ तिसगांव अंतर्गत नुकतेच करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केडीएमसी शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, सीआरसी प्रमुख भारती ओंकारेश्वर, मुख्याध्यापक दशरथ म्हात्रे, निर्मला वाघ, गणेश जगदाळे, प्रियंका काकडे उपस्थित होते.

प्रशासन अधिकारी भारत बोरनारे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, केंद्रप्रमुख ओमकारेश्वर यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रशासन अधिकारी यांनी विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांना शुभेच्छा दिल्या. या विज्ञान प्रदर्शनातून अनेक शास्त्रज्ञ निर्माण होतील, जिद्द परिश्रम यांची योग्य जोड दिल्यास जीवनात यशस्वी व्हाल. यासाठी नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट तयार करून आपले शहर स्वच्छ सुंदर कसे राहील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मार्गदर्शन प्रशासन अधिकारी भारत बोरनारे यांनी केले.

**जिद्द परिश्रम यांची योग्य जोड दिल्यास जीवनात यशस्वी व्हाल**
**- प्रशासन अधिकारी भारत बोरनारे**

परीक्षक म्हणून प्रियंका चौधरी यांनी काम पाहिले. सीआरसी प्रमुख भारती ओंकारेश्वर व तिसाई विद्यालयाचे मुख्याध्यापक दशरथ म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शनाचे उत्तम नियोजन करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनात खाजगी शाळांपैकी प्रथम क्रमांक त्रिनिटी स्कूल कल्याण पूर्व, द्वितीय क्रमांक तिसाई विद्यालय कल्याण पूर्व व उत्तेजनार्थ चेतना विद्यालय कल्याण पूर्व या शाळांना मिळाला. तसेच मनपास्तर प्रथम क्रमांक जरीमरी प्राथमिक शाळा क्रमांक -18 तिसगाव कल्याण पूर्व या शाळेने पटकावला. विज्ञान प्रदर्शनात एकूण 13 शाळांनी सहभाग नोंदवला.

# राज्यातील सर्व कारागृहांमध्ये आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसाचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : राज्यात मुंबई उच्च न्यायालयाअंतर्गत असलेल्या' महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सर्व कारागृहांमध्ये बुधवारी 10 डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसाचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग 'ही राज्यातील मानवी हक्कांबाबत कायदेशीर कारवाई करणारी संस्था आहे.

10 डिसेंबर 1948 मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा' (यूडीएचआर) स्वीकारला होता. म्हणूनच 10 डिसेंबर हा दिवस मानवी हक्कांबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी साजरा होतो. कैद्यांना त्यांच्या कारावासातील कालावधीत त्यांचे जीवन, समता, सन्मान आणि स्वातंत्र्याबद्दलचे कायदेशीर अधिकार कळावेत, याकरिता हा जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष मा. न्यायमूर्ती ए. एम. बदर यांच्या संकल्पनेतून, सदस्य मा. न्यायमूर्ती, स्वप्ना जोशी, संजय कुमार (भापोसे) यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील सर्व कारागृहांत 'कैद्यांचे मानवी हक्क आणि संरक्षण' या विषयी माहितीपुस्तिकेचे वाटप आणि मार्गदर्शन करून कायदेविषयक जागृती करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सचिव प्रदीपकुमार डांगे (भाप्रसे) आणि महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा या संस्थेचे अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक सुहास वारके (भापोसे) तसेच विजय केदार, निबंधक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

बुधवारी सकाळी ११ वाजल्यापासून होणाऱ्या या कार्यक्रमात राज्यातील सर्व प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त, कारागृह प्रशासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत.

## सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालय रा. से. यो. व इतिहास विभागामार्फत
# गिरीदुर्ग किल्ले गोरखगड परिसर स्वच्छता मोहीम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

सोमवार दि. ०८ डिसेंबर, २०२५ रोजी रा. से. यो आणि इतिहास विभागामार्फत गिरीदुर्ग किल्ले गोरखगड स्वच्छता मोहीम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना गड किल्ल्यांविषयी माहिती व्हावी तसेच गड किल्ल्यांची स्वच्छता करणे हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तसेच इतिहास विभागाचे एकत्रित एकूण ५० विद्यार्थी तसेच प्रा. दिपक शेळके(राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी),




प्रा. कन्या हरड (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी),प्रा. काजल डोहळे (इतिहास विभाग प्रमुख), प्रा. मयूर कराळे (मराठी विभाग प्रमुख) विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. प्रा. डोहळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना गोरखगड किल्ल्याविषयी उपयुक्त अशी माहिती दिली. या स्वछता मोहिमेत विद्यार्थ्यांचे गट तयार करून संपूर्ण मार्ग, पायथा मंदिर परिसर आणि शिखर मार्ग स्वच्छ केला. अंदाजे २० किलो कचरा संकलित केला गेला. गोरखगड स्वच्छता मोहिम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षणाची जाणीव आणि ऐतिहासिक स्थळांविषयी आदराची भावना निर्माण केली गेली तसेच गिरिदुर्ग चढाई करणारे गिर्यारोहक व पर्यटक यांना स्वच्छतेचा चांगला संदेश देण्यात आला. या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे , संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे ,संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे , महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024